MHPU180012022019

<u>नि.दि.दा.क्र. १८२/२०१९</u>
**( दत्तात्रय वि. ताराबाई व इतर )**

## <u>निशाणी १६ वरील आदेश</u>

(दिनांक १९ डिसेंबर, २०१९ रोजी पारित)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, त्याने दावा जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमाचा अनुतोष मिळण्यासाठी दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज मे. न्यायालयात चालु असुन सदर दावा नि. ५ चे सुनावणीसाठी नेमला आहे. दाव्यामध्ये दावा दाखल करतांना काही तांत्रिक चुका झालेल्या आहेत, तसेच अनावधानाने महत्वाचा मजकुर दाव्यामध्ये समाविष्ट करणेचे राहुन गेले आहे. म्हणून वादी यांना दाव्यामध्ये काही दुरुस्त्या करणे आवश्यक झाले आहे. सबब, त्या अनुषंगाने देखील दावा दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

३. त्या अनुषंगाने वादींनी दाव्यामध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती प्रस्तावित केली आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार नाही, असे नमूद केले आहे. तरी अर्जात नमुद परिच्छेद क्र. ३ ते ६.अ व ११ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळण्याचा अनुतोष मागीतला आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे नि. १८ वर दिले आहे व अर्ज मंजुर करण्यास आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, वादीस सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल करण्यास कोणतेही कधीही कायदेशीर कारण

घडलेले नव्हते व नाही. सदर अर्ज खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. वादी हे मनाई बाबतची दुरुस्ती मागत असल्यामुळे दाव्याचे स्वरुप बदलत आहे व त्यामुळे प्रतिवादीच्या बचावास बाधा येत आहे. प्रतिवादी क्र. १ हिच्या नावातील चुक हि प्रतिवादींना त्रास देण्याच्या हेतुने केलेली आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचा सन १९८८ पासून प्रत्यक्ष ताबा व वहिवाट आहे. त्यामुळे, वादी यांना सदर दाव्यात दुरुस्ती करता येणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरूपात अमुलाग्र बदल होईल व प्रतिवादींच्या बचावास बाधा येईल. वादीने दाखल केलेला दुरुस्तीचा अर्ज कायदेशीर नाही त्यामुळे वरील सर्व कारणांचा विचार करता सदरचा अर्ज नामंजुर करावा.

५. अर्जदारांच्या वकीलांचा व प्रतिवादींच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदारांच्या वकिलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ हिच्या नावामध्ये टंकलेखनाच्या चुकीमुळे चुक झालेली आहे. तसेच, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बारामती येथे विशेष दिवाणी दावा १२१/२०१७ च्या निकालाचा चुकीचा अर्थ काढून दावा जमीन विकण्याची भाषा प्रतिवादी करत आहे. त्यामुळे त्या अनुषंगाने अनुतोष मागितलेला आहे. त्या बाबी प्रस्तावित दुरूस्तीने अर्जदार दाव्यात समाविष्ट करू इच्छित आहेत. त्यामुळे, अर्ज मंजुर करावा.

६. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरूपात अमुलाग्र बदल होईल व प्रतिवादीच्या बचावास बाधा येईल. वादीने दाखल केलेला दुरुस्तीचा अर्ज कायदेशीर नाही त्यामुळे वरील सर्व कारणांचा विचार करता सदरचा अर्ज नामंजुर करावा.

७. प्रस्तूत अर्जाचे व दाव्याचे अवलोकन केले असता अर्जदार प्रस्तावित दुरूस्ती अन्वये दाव्यामध्ये दावा प्रलंबित काळात घटना दाव्याच्या अभिलेखास आणू इच्छित आहे असे दिसून येत आहे. त्याचप्रमाणे, टंकलेखकाच्या चुकीमुळे झालेली प्रतिवादी क्र. १ च्या नावातील चुक दुरुस्त करत आहे. अश्या परिस्थितीत दाव्याच्या मुळ स्वरूपात बदल होत असल्याचे दिसून येत नाही. अर्जदारांनी कोणतीही कबुली प्रस्तावित दुरूस्तीन्वये काढून घेतलेली नाही.

८. प्रस्तावीत दुरूस्तीमुळे प्रतिवादींना काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने दाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच प्रतिवादींना कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये वादी कुठल्याही प्रकारे नवीन केस मांडत नाहीत. दाव्यामध्ये पुराव्यास अजुन सुरुवात झालेली नाही. प्रतिवादींनी त्यांच्या बचावास कशाप्रकारे बाधा निर्माण होत आहे हे दर्शवून दिलेले नाही. दाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख—या वादाच्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक वाटते. वादीच्या म्हणण्यानूसार दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बारामती येथील विशेष दिवाणी दावा क्र. १२१/२०१७ चा निर्णय झाल्यानंतर त्या आदेशाचा वेगळा अर्थ काढून प्रतिवादी दावा जमीन विकण्याची भाषा करत आहेत. प्रतिवादींच्या म्हणण्यामध्ये सदर प्रकरणाचा निकाल १०.१०.२०१८ रोजी झालेला आहे. अर्जदाराने प्रतिवादींनी धमकी दिल्याबाबत विशिष्ट तारीख नमुद केलेली नाही. यावरुन, वादी दावा प्रलंबित काळात घडलेली घटना जवळपास एक वर्ष उशिराने दाव्याच्या अभिलेखात आणत आहे असे दिसून येत आहे. याबाबत, वादीचा निष्काळजीपणा दुर्लक्षुन चालणार नाही. वादीने केलेल्या निष्काळजीपणाबाबत दुर्लक्षून चालणार नाही. तरी वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश

पारीत करीत आहे:—

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराने प्रतिवादी यांना रक्कम रु. ३००/— (रक्कम रुपये तीनशे फकत) अर्ज खर्च म्हणून द्यावा.

३. अर्जदारास अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

४. अर्जदाराने दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत करून घ्यावी.

दौंड.
दिनांक : १९/१२/२०१९

(एन. बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, कोर्ट क्र.१.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. N. B. Jadhav, Civil Judge Junior Division, Daund [Court No.1]. |
| Name of the Steno | : | Miss. F. J. Bijapure, Steno Grade-3. |
| Judgment date | : | 19/12/2019. |
| Judgment signed by P.O. on | : | 20/12/2019. |
| Judgment uploaded on | : | 20/12/2019. |